GLOBAL EDITION
सामना
सर्वांसाठी सर्वकाही
मराठी माणसाचे
स्वतःचे वृत्तपत्र.

# जनावरांच्या रोगावर होमिओपॅथी औषधांचा वापर यशस्वी - डॉ. निकम

अवसरी बुद्रुक, दि. २ (सा. वा.) - जनावरांच्या आरोग्याचा अभ्यास हा पशुवैद्यकांच्या दृष्टीने आव्हानात्मक असून, जनावरांच्या अनेक दुर्धर आजारांवर 'मिशन होमिओपॅथी' उपक्रमांतर्गत होमिओपॅथी औषधाचा प्रथमच वापर केला जात असून, त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर यश प्राप्त झाल्याची माहिती होमिओपॅथी संशोधक डॉ. अमरसिंह निकम यांनी दिली.

आंबेगाव तालुक्यातील अवसरी बुद्रुक येथील यशोदीप गार्डन मंगल कार्यालयात मिशन होमिओपॅथी व ऊर्जा फौंडेशनच्या वतीने आयोजित केलेल्या जनावरांच्या विनामूल्य होमिओपॅथी उपचार शिबिराचे उद्घाटन डॉ. अमरसिंह निकम यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भीमाशंकर साखर कारखान्याचे अध्यक्ष देवदत्त निकम होते. यावेळी भीमाशंकरचे संचालक ज्ञानेश्वर गावडे, ऊर्जा फौंडेशनचे प्रमोद हिंगे, बाळासाहेब गावडे, शांतारामबापू हिंगे, नामदेव थोरात, सरपंच बाळासाहेब हिंगे, संजय चव्हाण, जिल्हा परिषद सदस्य मथाजी पोखरकर उपस्थित होते.

या शिबिरामध्ये एकूण १९० संकरित गायी व जनावरांच्या वंधत्व, मस्टायटीस, सडातील गाठ, त्वचारोग, पॅरालिसीस अशा प्रकारच्या दुर्धर आजारांवर होमिओपॅथी उपचार करण्यात आले. डॉ. निकम म्हणाले, जनावरांसाठी जगामध्ये आतापर्यंत आयुर्वेदिक तसेच ॲलोपॅथी औषधोपचार केले जात होते. परंतु होमिओपॅथी औषधोपचारही जनावरांच्या विविध आजारांवर गुणकारी असल्याचे प्रयोगावरून सिद्ध झाले झाले. बाळासाहेब हिंगे यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. बी. एस. घंगाळ यांनी प्रास्ताविक केले.